स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणारा प्रवासभत्ता सार्वजनिक बँकांमार्फत त्यांच खात्यात जमा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक, क्रमांक- संकीर्ण-१०९८/२२२/प्र. क्र. ४७/९८/स्वातंक्ष-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- 30 एप्रिल ९८.

वाचावे – [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओएस-१०८३/स्वातंक्ष दिनांक २२ जुलै, १९८६

[२] शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१०९७/प्र. क्र. ५९/९७/स्वातंक्ष-१, दिनांक १६/२/९८

## परिपत्रक

राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांना/त्यांच्या विधवांना शासनातर्फे दरमहा स्वातंत्र्य सैनिक पेन्शन दिले जाते. ज्या स्वातंत्र्य सैनिकांनी त्यांचे निवृत्तीवेतन बँकेमार्फत स्विकारण्याचा पर्याय स्विकारला आहे. त्यांना त्यांचे निवृत्तीवेतन शासन निर्णय, क्रमांक पीओएस-१०८३/स्वातंक्ष, दिनांक २२/७/१९८६ नुसार देण्यात येते.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण-१०९७/प्र. क्र. ५९/९७/स्वातंक्ष-१, दिनांक १६/२/९८ अन्वये स्वातंत्र्य सैनिकांना बँकेमार्फत पेन्शन अदा करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांना दरवर्षी देय असणारा रु. ५००/- हा प्रवासभत्ता त्यांच्या पेन्शन खात्यात जमा व्हावा अशी स्वातंत्र्य सैनिकांची मागणी होती. सदर मागणीबाबत विचार करण्यात येऊन आता शासन असा आदेश देत आहे की, स्वातंत्र्य सैनिकांना दरवर्षी देय असणारा रु. ५००/- हा प्रवासभत्ता. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पेन्शनबरोबर त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा व नवीन पेन्शन धारकांच्या

कृ. मा. प....२/-..

प्रथम पेन्शनबरोबर चालू वित्तीय वर्षाचा प्रवासभत्ता त्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

[१] मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
[२] मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
[३] मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
[४] मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती
[५] मा. सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती
[६] उच्चाधिकार समितीचे सर्व सदस्य
[७] वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
[८] सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी
[९] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
[१०] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
[११] महालेखापाल महाराष्ट्र-१ मुंबई
[१२] महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
[१३] सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
[१४] स्वातंत्र्य सैनिक कक्ष- २ व ३

ोजनार २९४९८